THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 11TH SEPTEMBER 1890.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८७२ चा इंडियाचा पुराव्याविषयीं कायदा आणि सन १८८२ चें क्रिमिनल प्रोसीजर कोड हीं सुधारण्याबाबत आक्टाचा मसुदा.

सन १८७२ चा इंडियाचा पुराव्याविषयीं कायदा आणि सन १८८२ चें क्रिमिनल प्रोसीजर कोड सुधारणें ज्या अर्थी योग्य आहे, त्या अर्थीं खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

### सन १८७२ चा इंडियाचा पुराव्याविषयीं कायदा.

१. (१) सन १८७२ चा इंडियाचा पुराव्याविषयीं कायदा, कलम १४, यास जोडलेल्या खुलाशाऐवजीं खालीं दिलेला मजकूर दाखल करावा: तो येणेंप्रमाणें :— सन १८७२ चा आक्ट १, कलम १४, याची सुधारणा.

"**खुलासा.**—यांत यापुढें निर्दिष्ट केलेलीं प्रकरणें शिवाय करून इतर प्रकरणांच्या बाबतींत, कोणतीहि गोष्ट मनाच्या कोणत्याहि लागू स्थितीचें अस्तित्व दाखविते ह्मणून लागू आहे असें असेल, तर, ती मनाची लागू स्थिति साधारणतः नव्हे पण ज्याविषयीं तक्रार असेल त्या विशेष विषयाच्या संबंधानें विद्यमान आहे असें त्या गोष्टीवरून दिसून आलें पाहिजे. वर जीं प्रकरणें अपवाद ह्मणून सांगितलीं आहेत, तीं खालीं दिलेलीं फौजदारी कामें होत; ह्मणजे—

(अ) आरोपी मनुष्यावरची पूर्वीं झालेली साबिती, ज्या फौजदारी कामांत अशी लागू गोष्ट असेल तीं फौजदारी कामें; अगर

(ब) ज्या फौजदारी कामांत, आरोपी मनुष्याची सन १८८२ चें क्रिमिनल प्रोसीजर कोड, कलम २३४, याअन्वयें एकाच प्रकारच्या तीन अपराधांबद्दल एकाच मुकदम्यांत चौकशी किंवा इनसाफ होत असून, अशी लागू गोष्ट, त्यांपैकीं कोणताहि अपराध शाबीत करण्याच्या कामांत इतर रीतीनें लागू असेल, तीं फौजदारी कामें; अगर

(क) ज्या फौजदारी कामांत आरोपी मनुष्याची इंडियन पीनल कोडाच्या १२ व्या बाबीअन्वयें अगर १८ व्या बाबीअन्वयें शिक्षा होण्यास पात्र अशा अपराधाबद्दल चौकशी किंवा इनसाफ होत असेल, तीं फौजदारी कामें."

(२) त्याच कलमास जोडलेल्या (ब) उदाहरणाबद्दल खालीं दिलेला मजकूर दाखल करावा: तो येणेंप्रमाणें:—

"(ब) अवर, त्यानें एक नकली नाणें कपटानें दुसऱ्या मनुष्याच्या स्वाधीन केलें, व तें स्वाधीन कारितांना तें नकली आहे हें त्याला ठाऊक होतें, असा आरोप आहे.

तर, जेव्हां तें अनें स्वाधीन केलें, तेव्हां त्याजवळ दुसरीं नकली नाणीं पुष्कळ होतीं, ही गोष्ट लागू होय.

अनें पूर्वीं अगर नंतर एकादे वेळीं एकादें नकली नाणें दुसऱ्या मनुष्याच्या स्वाधीन केलें होतें, ही गोष्ट लागू होय.

अ यास एकादें नकली नाणें नकली आहे असें ठाऊक असून त्यानें तें खरें ह्मणून दुसऱ्याच्या स्वाधीन केल्याबद्दल त्यावर शाबिती पूर्वीं झाली होती, ही गोष्ट लागू होय.

सन १८७२ चा आक्ट १, कलम १५, याची सुधारणा.

२. सदर्हू कायद्याच्या १५ व्या कलमांत, "किंवा समजून उमजून झालें असा" या मजकुरानंतर "किंवा कांहीं एकादें कृत्य कांहीं विवक्षित ज्ञान असून किंवा कांहीं विवक्षित उद्देशानें करण्यांत आलें असा" हा मजकूर दाखल करावा. आणि त्याच कलमास जोडलेल्या (क) उदाहरणाबद्दल खालीं दिलेला मजकूर दाखल करावा:—

"(क) अवर असा आरोप आहे कीं, हिरे नाहींत असें त्याला माहीत असलेले जिन्नस त्यानें हिरे ह्मणून बकडे गहाण ठेवून त्याला ठकविलें.

आतां असा प्रश्न आहे कीं, ते जिन्नस हिरे नाहींत असें अला माहीत होतें कीं नव्हतें.

तर, अनें बकडे ते हिरे गहाण ठेवल्याच्या आधीं थोडावेळ किंवा तसे ठेवल्याबर थोड्याच वेळानें क, ड व ई यांजकडे नकली हिरे गहाण ठेविले होते, या गोष्टींवरून, अनें बकडे गहाण ठेविलेले जिन्नस हिरे नव्हते असें अला माहीत होतें असें दिसून येतें ह्मणून त्या गोष्टी लागू होत."

सन १८७२ चा आक्ट १, कलम २६, यांत जास्त मजकूर दाखल करणें.

३. सदर्हू कायद्याच्या २६ व्या कलमांत खालीं दिलेला मजकूर जास्त दाखल करावा; तो येणेंप्रमाणें:—

"खुलासा.—या कलमांत "माजिस्ट्रेट" या शब्दाचा अर्थ, सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाअन्वयें माजिस्ट्रेटाचे सर्व अगर कोणतेहि अधिकार चालविणारा मनुष्य असा समजावा."

सन १८७२ चा आक्ट १, कलम ४३, याची सुधारणा.

४. (१) सदर्हू कायद्याच्या ४३ व्या कलमाऐवजीं खालीं दिलेला मजकूर दाखल करावाः तो येणेंप्रमाणेंः—

"४३. अपराध साबीत झाल्याबद्दलचे ठराव अगर शिक्षा, आणि ४०, ४१ व ४२, या कलमांत सांगितलेले फैसले, हुकुम अगर हुकुमनामे शिवाय करून इतर फैसले, हुकुम अगर हुकुमनामे गैर लागू होत. मात्र, तो अपराध साबीत झाल्याबद्दलचा ठराव झाला आहे कीं काय, अगर ती शिक्षा झालेली आहे कीं काय अगर तसला फैसला, हुकुम अगर हुकुमनामा झालेला आहे कीं काय ही जेव्हां एक मुद्देगोष्ट असेल, अगर या आक्टाच्या कोणत्याहि इतर ठरावाअन्वयें लागू गोष्ट असेल तेव्हां वरील ठराव लागू होणार नाहीं."

(२) त्याच कलमांत खालीं दिलेलीं उदाहरणें जास्त दाखल करावीं: तीं येणेंप्रमाणें:—

"(ई) अ यावर असा आरोप आहे कीं, त्यानें चोरी केली आहे, आणि पूर्वी त्यावर चोरी केल्याची साबिती झाली होती; तर, ती पूर्वीची साबिती मुद्देगोष्ट असल्याच्या योगानें लागू आहे.

(फ) बचा खून केल्याबद्दल अची चौकशी किंवा इन्साफ होत आहे. तर, बनें अवर अब्रू घेणारा मजकूर लिहून प्रसिद्ध केल्याबद्दल फिर्याद केली होती, आणि तेव्हां अवर साबिती होऊन त्याला शिक्षा झाली होती, ही गोष्ट मुद्देगोष्टीचा उद्देश दाखविते ह्मणून कलम ८ अन्वयें लागू गोष्ट आहे असें समजावें."

५. सदर्हू कायद्याच्या ५४ व्या कलमाऐवजीं खालीं दिलेला मजकूर दाखल करावाः तो येणेंप्रमाणें:— सन १८७२ चा आक्ट १, कलम ५४, याऐवजीं नवीन कलम दाखल करणें.

"५४. फौजदारी कामांत, आरोपी मनुष्याचा लौकिक वाईट आहे ही गोष्ट गैर लागू होय; मात्र, त्याचा लौकिक चांगला आहे असा पुरावा दिला असेल तर, त्याचा लौकिक वाईट आहे ही गोष्ट लागू होय. पूर्वीचा लौकिक चांगला आहे असा पुरावा दिला असेल त्याला प्रत्युत्तर देण्याचा प्रसग खेरीज-करून इतर प्रसंगीं पूर्वीचा लौकिक वाईट आहे ही गोष्ट लागू नाहीं.

"खुलासा १.—ज्या प्रकरणांत कोणत्याहि मनुष्याचा वाईट लौकिक हीच एक मुद्देगोष्ट असेल, त्या प्रकरणास हें कलम लागू नाहीं असें समजावें.

"खुलासा २.—पूर्वीची साबिती वाईट लौकिकाबद्दल पुरावा या नात्यानें लागू होय."

६. सदर्हू कायद्याचें कलम ५५ यास जोडलेल्या खुलाशांत, "परंतु" या शब्दा-नंतर, "कलम ५४ यांतले ठराव लागू असलेले प्रसंग शिवाय करून इतर प्रसंगीं" हा मजकूर दाखल करावा. सन १८७२ चा आक्ट १, कलम ५५, याच्या खुलाशाची सुधारणा.

७. सदर्हू कायद्याचें कलम ८६ यांत "आणि त्या देशामध्यें वास करणारा" या मजकुराऐवजीं, "आणि त्या देशांतला अगर त्या देशाकरितां" हा मजकूर दाखल करावा; आणि त्याच कलमांत खालीं दिलेला मजकूर जास्त दाखल करावाः— सन १८७२ चा आक्ट १, कलम ८६, याची सुधारणा व त्यांत जास्त मजकूर दाखल करणें.

"जो कोणताहि अमलदार महाराणीच्या राज्याचा भाग नव्हे अशा कोणत्याहि मुलुकाच्या अगर जागेच्या संबंधानें त्या मुलुकाकरितां अगर जागेकरितां सन १८७९ चा परमुलुकांतील हुकुमत आणि अपराध्यांस स्वाधीन करणें याविषयींचा आक्ट, कलम ३, यांत आणि सन १८८२ चें क्रिमिनल प्रोसिजर कोड, कलम १९० यांत व्याख्या केल्याप्रमाणें पोलिटिकल एजंट असेल, तो, या कलमाच्या कारणासाठीं, त्या मुलुकाचा अगर जागेचा ज्या देशांत समावेश होत असेल त्या देशांतला व त्या देशाकरितां हिंदुस्तान सरकाराचा प्रतिनिधि आहे असें समजावें."

## सन १८८२ चें क्रिमिनल प्रोसीजर कोड.

८. सन १८८२ चें क्रिमिनल प्रोसीजर कोड, कलम ३१०, यांत खालीं दिलेला मजकूर जास्त दाखल करावाः तो येणेंप्रमाणें:— सन १८८२ चा आक्ट १०, कलम ३१०, याची सुधारणा.

"या कलमांत कोणताहि ठराव असला तरी, नंतरच्या अपराधाचा इन्साफ करते वेळेस पूर्वी झालेल्या अपराधाच्या शाबितीच्या ठरावाचा पुरावा देणें तो ती पूर्वीच्या शाबितीच्या ठरावाची गोष्ट सन १८७२ चा इंडियाचा पुराव्याविषयीं काय-दा याच्या ठरावामन्वयें लागू असेल तर, द्यावा."

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

आरोपी मनुष्याचा लौकिक वाईट आहे, आणि ह्मणून, त्याजवर जो अपराध केल्याचा आरोप आहे तो अपराध त्यानें केल्याचा जास्त संभव आहे असें दाखविण्यासाठीं मात्र त्या आरोपीवर झालेली पूर्वींची साबिती साबीत करून दाखविण्याचा प्रयत्न केला जातो तेव्हां ती पूर्वींची साबिती गैर लागू ठरवितां यावी अशा रीतानें सन १८७२ चा इंडियाचा पुराव्याविषयीं कायदा, कलम ५४, याची सुधारणा करावी हा या मसुद्याचा मुख्य उद्देश आहे. अमुक मनुष्यानें कांहीं अपराध केल्याबद्दल त्यावर पूर्वीं शाबिती झाली होती या गोष्टीचा, स्वतंत्रपणें, त्यानें दुसरा अपराध केला आहे असें स्थापित करण्याच्या कामांत पुरावा या नात्यानें विलकुल उपयोग नाहीं; आणि ज्या पुराव्यावरून आरोपी मनुष्याविरुद्ध वाईट ग्रह मात्र उत्पन्न व्हावयाचा, तो पुरावा घेणें योग्य नाहीं; ह्मणून, फौजदारी कामांत, आरोपी मनुष्यावर पूर्वीं कोणत्याहि अपराधाची साबिती झाली आहे ही गोष्ट लागू होय असा कलम ५४ यांत जो ठराव आहे, तो रद्द करावा असें या मसुद्याचें कलम ९ यावरून ठरावयाचें आहे. कायद्याची अशी सुधारणा केली ह्मणजे, पूर्वींच्या साबितीच्या लागूपणाच्या संबंधाचे ठराव त्या आक्टाच्या ४३ व्या कलमांत राहतील. पूर्वींच्या साबितीची गोष्ट मुद्देगोष्ट असेल तेव्हां अगर त्या आक्टाच्या एखाद्या ठरावाअन्वयें ती लागू असेल तेव्हां मात्र आरोपीवरच्या त्या साबितीचा फैसला विद्यमान असल्याची गोष्ट लागू समजली जाईल.

२. त्याचप्रमाणें, सदर्हू आक्टांत आणखी दोन सुधारणा करणें आवश्यक आहे. पहिली सुधारणा ही कीं, लौकिकाबद्दलचा पुरावा लागू असेल त्या फौजदारी कामांत वाईट लौकिक साबीत करण्यासाठीं, पूर्वींची साबिती लागू होय असें त्या आक्टांत ठरवावें, आणि दुसरी सुधारणा ही कीं, मनाची लागू स्थिति साबीत करण्याकरितां, उदाहरणार्थ, अपराध करण्याचा उद्देश अगर आपणांकडून अपराध होत आहे असें ज्ञान असल्याची गोष्ट साबीत करण्याकरितां, पूर्वींची साबिती लागू धरितां येईल असें त्या आक्टांत ठरवावें. पैकीं पहिली सुधारणा, या मसुद्याच्या ९ व्या कलमाअन्वयें सुधारलेल्या त्या आक्टाच्या ५४ व्या कलमास एक खुलासा जास्त जोडून करावी असा इरादा आहे. दुसरी सुधारणा या मसुद्याच्या १ ल्या कलमाच्या योगानें करावयाची आहे. त्या कलमांत आक्टाच्या १४ व्या कलमाचा खुलासा सुधारला आहे; आणि त्या सुधारणेच्या योगानें, अपराध घडेल असें ज्ञान असल्याबद्दलची गोष्ट अगर अपराध करण्याचा उद्देश असल्याबद्दलची गोष्ट दृष्टोत्पत्तीस आणून देण्याकरितां पूर्वींची अपराधाची साबिती साबीत करितां येईल.

३. इंग्लिश कायद्याप्रमाणें, खोटें नाणें अगर बनावट नोटी चालविल्याबद्दलच्या खटल्यांत, तो अपराध घडेल असें ज्ञान असल्याची गोष्ट साबीत करण्याच्या कारणासाठीं, जें कृत्य केल्याचा चार्ज ठेविलेला असेल त्या प्रकारचीं इतर कृत्यें केल्याबद्दल पुरावा देतां येतो (१ रसेल २३३). एकंदरींत असें दिसून येतें कीं, आजपर्यंत, या प्रकारचा पुरावा फक्त नाणें पाडण्याच्या आणि बनाऊ लेख केल्याच्या खटल्यांत मात्र घेण्यांत आला आहे; परंतु, खोटी बतावणी करून पैसा मिळविल्याच्या एका खटल्यांत त्या प्रकारचा पुरावा घेण्यांत आला होता;—राणी विरुद्ध फ्रान्सिस—(४३ एल. जे. एम्. सी. ९७). त्या खटल्यांत लार्ड कोलरिज, सी. जे., हे असें म्हणाले कीं, "तत्त्वदृष्टया हें स्पष्ट आहे कीं, जें कृत्य केल्याचा कैदीवर आरोप असेल तें कृत्य त्यानें केलें अशी साबिती झाल्यावर, त्यानें तें कृत्य ज्या वेळीं केलें त्या वेळीं तें कृत्य केल्यानें अमुक प्रकारचा अपराध घडेल अशी त्यास माहिती होती कीं काय अगर त्यानें तें कृत्य चुकीनें केलें कीं काय एवढ्याच प्रश्नाचा निकाल बाकी राहातो तेव्हां, या खटल्यांत ज्या प्रकारचा पुरावा घेतला आहे त्या प्रकारचा पुरावा घेतलाच पाहिजे." हें तत्त्व या खटल्यांत (**राणी विरुद्ध फ्रान्सिस**) जितकें जास्त लागू केलें आहे तितकें बहुतकरून तें दुसऱ्या कोणत्याहि खटल्यांत लागू केलेलें नाहीं; आणि कलम १९ यांत जी सुधारणा करण्याचें योजिलें आहे, ती सुधारणा, ज्या प्रकारचे खटले अपराधाच्या विशेष प्रकारावरून केवळ सदरील प्रश्नाच्या निकालावर अवलंबून असतात, त्या प्रकारच्या खटल्यांच्या बाबतींत लागेल तितकी उपयोगी पडेल असें वाटतें. म्हणून, या मसुद्याचें कलम १, यांत, इंडियन पीनल कोडाची बाब १२ (नाण्यासंबंधी व स्टांपासंबंधीं अपराध) व बाब १८ (बनाऊ लेख करण्याचे अपराध) यांअन्वयें शिक्षा करण्यास पात्र अशा अपराधांच्या बाबतींत त्या प्रकारचा पुरावा द्यावा असा ठराव आहे.

४. इंडियन पीनल कोडाच्या १२ व्या व १८ व्या बाबींखालचे अपराध शिवाय करून इतर अपराधांच्या खटल्यांचे बाबतींत, अपराध घडेल असें ज्ञान होतें ही गोष्ट साबीत करण्यासाठीं त्याच प्रकारच्या इतर कृत्यांचा पुरावा घ्यावा किंवा नाहीं याबद्दल असा अभिप्राय आहे कीं, सन १८८२ चें क्रिमिनल प्रोसीजर कोड, कलम २३४, याअन्वयें आरोपी मनुष्यावर एकाच प्रकारचे तीन अपराध केल्याचा आरोप असून त्यांचा इन्साफ एकाच मुक-

दम्यांत केला जात असेल तेव्हां तसा पुरावा घेण्यास हरकत नाहीं. ह्मणजे, या तीन अपराधांपैकीं कोणताहि एक अपराध साबीत करण्याकरितां दिलेला पुरावा, बाकीच्या अपराधांच्या बाबतींत, अपराध घडेल असें ज्ञान असल्याची अगर अपराध करण्याचा उद्देश असल्याची गोष्ट साबीत करण्याकरितां लागू पुरावा आहे असें ठरवावयाचें आहे. त्या आरोपी मनुष्यावर तीन अपराध केल्याचा आरोप असून त्याचा त्या तिन्ही अपराधांबद्दल इन्साफ केला जात असतो ह्मणून त्याला त्याच्या विरुद्ध आणिलेला पुरावा नासाबीत करण्याची सवड असते, आरोपास लागू नाहींत असे मुद्दे काढले जात नाहींत, आणि याप्रकारचा पुरावा घेण्याविरुद्ध ज्या हरकती आहेत त्या हरकती अशा खटल्यांत विद्यमान नसतात. चोरलेला माल लबाडीनें घेण्याबद्दलचा व्हिक्टोरिआ महाराणीच्या राज्याच्या ३४ व ३५ व्या वर्षांतील ११२ व्या चाप्टराचें कलम १९, यांत जो ठराव आहे त्या ठरावाचा या सूचनेला आधार आहे. याप्रकारचा पुरावा घेण्यासाठीं कलम १, रकम (ब) यांत आक्टाच्या १४ व्या कलमाच्या खुलाशाची सुधारणा केली आहे.

५. कोणत्याहि नंतरच्या अपराधाच्या बाबतींत पूर्वीची साबिती लागू पुरावा आहे असें साबीत करितां येईल कीं नाहीं या प्रश्नाच्या संबंधानें सन १८८२ चें क्रिमिनल प्रोसीजर कोड, कलम ३१०, यांत सुधारणा केली पाहिजे असें वाटतें. वर ज्या सुधारणा कराव्या ह्मणून योजिलें आहे, त्या सुधारणांच्या योगानें, आरोपी मनुष्याबद्दल वाईट ग्रह मात्र उत्पन्न करण्याकरितां पूर्वीची साबिती साबीत करितां यावयाची नाहीं ह्मणून, असा ठराव करणें योग्य आहे कीं, पूर्वीची साबिती सन १८७२ चा इंडियाचा पुराव्याविषयीं कायदा याअन्वयें लागू असेल तेव्हां तशा साबितीबद्दलचा पुरावा घेतां येऊं नये असा सन १८८२ च्या क्रिमिनल प्रोसीजर कोडाच्या ३१० व्या कलमांतल्या कोणत्याहि ठरावाचा उद्देश नाहीं. असा ठराव केल्याचा असा परिणाम होईल कीं, पूर्वी अपराधाची साबिती झाल्यानंतर केलेल्या अपराधाबद्दल कोणत्याहि आरोपीवर आरोप येईल तेव्हां, ती साबिती, अपराध होईल असें ज्ञान असल्याची अगर अपराध करण्याच्या उद्देशाची गोष्ट साबीत करण्याकरितां, आणि त्याचप्रमाणें आरोपीनें आपल्या चांगल्या लौकिकाचा पुरावा दिला असल्यास त्यास प्रत्युत्तर देण्याकरितां, लागू होईल. ही योजिलेली सुधारणा, मसुद्याच्या ८ व्या कलमांत दाखल केली आहे.

६. या मसुद्याअन्वयें सन १८७२ चा इंडियाचा पुराव्याविषयीं कायदा यांत ज्या सुधारणा करण्याचें योजिलें आहे, त्या थोडक्यांत येणेंप्रमाणें:--

(१) पूर्वीची साबिती कोणत्याहि खटल्यांत साबीत करण्याची मोकळीक असे, तो ठराव आतां रद्द केला जाईल ;

(२) पूर्वीची साबिती मुद्देगोष्ट असेल तेव्हां अगर आक्टाखालीं इतर रीतीनें लागू असेल तेव्हां कलम ४३ अन्वयें लागू होईल ;

(३) वाईट लौकिकाचा पुरावा लागू असेल तेव्हां तशा लौकिकाचा पुरावा या नात्यानें पूर्वीची साबिती लागू होईल ;

(४) अपराध होईल असें ज्ञान असल्याची अगर अपराध करण्याच्या उद्देशाची गोष्ट साबीत करण्याचे बाबतींत पूर्वीची साबिती लागू होईल ;

(५) नाणें पाडणें व बनाऊ लेख करणें यांच्या बाबतींत, ज्ञान, उद्देश, वगैरे मनाची कोणतीहि स्थिति दाखविणाऱ्या गोष्टी, त्यांवरून चालू विवक्षित प्रकरणाच्या संबंधाची मनाची स्थिति दिसून येत नसली तरी, लागू होतील ;

(६) आरोपी मनुष्याचा एकाच प्रकारचे तीन अपराध केल्याबद्दल सन १८८२ चें क्रिमिनल प्रोसीजर कोड, कलम २३४, याअन्वयें एकाच मुकदम्यांत इन्साफ केला जात असेल तेव्हां त्यांपैकीं एक अपराध साबीत करण्यास लागू पुरावा बाकीच्या अपराधांपैकीं कोणत्याहि अपराधाच्या बाबतींत, अपराध घडेल असें ज्ञान असल्याची गोष्ट अगर अपराध करण्याचा उद्देश असल्याची गोष्ट दाखविण्यासाठीं उपयोगांत आणतां येईल ;

(७) अमुक कृत्य त्यासारख्या इतर कृत्यांच्या माळिकेपैकीं एक असून त्यांपैकीं प्रत्येक कृत्याशीं तें कृत्य करणाऱ्या मनुष्याचा संबंध होता ही गोष्ट, अपराध घडेल असें ज्ञान असल्याची अगर अपराध करण्याचा उद्देश असल्याची गोष्ट साबीत करण्यास लागू गोष्ट होईल.

७. या मसुद्याचीं कलमें ३ व ७ ह्यांचा संबंध अनुक्रमें इं. ला. रि. २ मद्रास, पृष्ठ ९ व १४ कलकत्ता, पृष्ठ ९४६ यांत दिलेल्या खटल्यांशीं आहे.

तारीख ४ माहे जुलई सन १८९०.

अण्डू आर. स्कोबल.

(True Translation)
Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.